बुलडाणा ◆ वर्ष - १ ◆ अंक -१४४◆ पृष्ठे - ४ ◆ RNI No . MHBIL/२५/A१४३५ ◆ batamijagata@gmail. com ◆ मुख्य संपादक : कैलास हरीभाऊ राऊत - ९५६१५९६६९३ ◆ मानद संपादक : गणेश निकम केळवदकर - ९४०३४७८५४०

दैनिक मंगळवार, दि. २ जून २०२६ आवाज जनसामान्यांच्या हक्काचा

# बातमी जगत

**TRENDING NEWS**

**रणवीर सिंह वादाच्या पार्श्वभूमीवर चित्रपट संघटनेविरुद्ध याचिका:निर्माता टीपी अग्रवाल यांनी बंदी घालण्याच्या अधिकाराला आव्हान दिले, म्हणाले - हे**

पान ३ वर



**# SHORT NEWS**

### सोनसाखळी लंपास

**यवतमाळ :** येथील जांब रोडवरील सुयोग मंगल कार्यालयाजवळून एका ६० वर्षीय महिलेच्या गळ्यातील १० ग्रॅमची सोन्याची पोत अज्ञात चोरट्याने लंपास केली. सौ. रेखा दिलीपराव चोंडके यांनी या प्रकरणी अवधूतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून, चोरी गेलेल्या पोतची किंमत १५,६३६ रुपये आहे. ही घटना ११ मे रोजी दुपारी २:०० वाजताच्या सुमारास घडली.

### ८ लाखांची फसवणूक

**यवतमाळ :**उमरसरा येथील एका ७३ वर्षीय व्यक्तीच्या मुलाला नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून ८ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सुरज शरद गामरे (रत्नागिरी) आणि गणेश वसंतराव झाडे (यवतमाळ) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांनी फिर्यादी दत्तात्रेय देशकर यांच्या मुलाकडून ५ लाख आणि त्यांच्या नातेवाईकाकडून ३ लाख रुपये घेऊन ही फसवणूक केली. अवधूतवाडी पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.

### कारची चोरी

**यवतमाळ :** लोहारा पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या वाघापूर येथील सह्याद्री अपार्टमेंटमधून एम.एच. ३२ वाय. ०८५७ क्रमांकाची स्विफ्ट डिझायर

✦ 17 जागांसाठी उमेदवारांचे अर्ज दाखल; महायुती आणि मविआत होणार थेट लढत; आमन-सामने कोण?

# महाराष्ट्रात विधान परिषदेची रणधुमाळी

**बातमी जगत | प्रतिनिधी**



**मुंबई :** राज्यातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी सर्वच राजकीय पक्षांसह काही अपक्ष उमेदवारांनी आपला उमेदवारी अर्ज भरला आहे. महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही प्रमुख आघाड्यांनी आपापले मोहरे मैदानात उतरवले असून, १७ मतदारसंघांतील लढतींचे चित्र आता स्पष्ट झाले आहे. अनेक ठिकाणी अपक्ष आणि बंडखोरांनी अर्ज भरल्याने चुरस वाढली असली, तरी मुख्य मुकाबला हा महायुती विरुद्ध मविआ असाच रंगणार आहे.

सत्ताधारी महायुतीमध्ये भारतीय जनता पक्षाने सर्वाधिक ११ जागांवर आपले उमेदवार रिंगणार उतरवले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना ४ जागांवर, तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस २ जागांवर निवडणूक लढवत आहे. विरोधी बाकांवरील महाविकास आघाडीत काँग्रेसने आक्रमक पवित्रा घेत ८ जागांवर आपले उमेदवार दिले आहेत. उद्धव ठाकरेंची शिवसेना (यूबीटी) ६ जागांवर, तर शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस ३ जागांवर नशीब आजमावत आहे. राज्यातील १७ मतदारसंघांत महायुती विरुद्ध मविआ अशी चुरस आहे. सोलापुरात राऊत विरुद्ध फत्तेपूरकर, अहिल्यानगरमध्ये तनपुरे विरुद्ध ससाणे, ठाण्यात फाटक विरुद्ध पवार तर जळगावात महाजन विरुद्ध तायडे सामना रंगेल. सांगली-साताऱ्यात माने, नांदेडमध्ये राजूरकर, यवतमाळात चतुर्वेदी, पुण्यात काकडे तर भंडारामध्ये ब्राह्मणकर महायुतीकडून लढत आहेत. रायगड आणि नाशिकमध्ये तटकरे व दराडे रिंगणात आहेत. वर्धा, अमरावती, धाराशिव, परभणी आणि संभाजीनगरमध्ये लखानी, पोटे, बसवराज पाटील, सईद खान व अधिकृत उमेदवारांची लढत काँग्रेस-ठाकरे गटाशी होईल. नागपूर पोटनिवडणुकीत डॉ. पोतदार विरुद्ध लोंढे अशी थेट लढत आहे.

### काही जागांवर 'पेच' आणि बंडखोरीचे आव्हान

✦ **अनेक मतदारसंघांत अपक्ष उमेदवारांनी अर्ज भरल्याने आणि स्थानिक नेत्यांनी नाराजी व्यक्त केल्याने दोन्ही आघाड्यांची डोकेदुखी वाढली आहे. महायुतीमध्ये रायगड, छत्रपती संभाजीनगर-जालना, यवतमाळ, पुणे, नाशिक, परभणी आणि नांदेड या ८ जागांवर नाराजांनी अर्ज दाखल करत बंडाचे निशाण फडकावले आहे. नाशिकसारख्या ठिकाणी मविआचा अधिकृत उमेदवार नसल्याने पेच निर्माण झाला आहे.**

### ४ जूनकडे सर्वांचे लक्ष

✦ **अनेक ठिकाणी अपक्ष उमेदवारांनी आणि नाराज नेत्यांनी अर्ज भरल्यामुळे अधिकृत उमेदवारांची डोकेदुखी वाढली आहे. ४ जून ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख असल्याने, त्या दिवशी बंडखोरी शमवण्यात नेत्यांना किती यश येते, यावरच विजयाचे समीकरण अवलंबून असेल. खरी लढत पक्षीय चिन्हांवर असली, तरी स्थानिक पातळीवरील गणिते या निवडणुकीत महत्त्वाची ठरणार आहेत.**

## कॉर्पोरेट जिहाद; मतीनसह घरमालक हनीफची चौकशी

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**नाशिक :** कॉर्पोरेट जिहाद प्रकरणातील प्रमुख संशयित निदा खानला छत्रपती संभाजीनगर येथे आश्रय दिल्याप्रकरणी सोमवारी पुन्हा एमआयएमचा नगरसेवक मतीन पटेल व घरमालक हनीफ शेख यांची विशेष पथकाकडून तपासणी झाली. 'मतीन भाई ने घर की चाबी मांगी थी, मुझे मालूम नहीं किसको घर दिया' असा जबाब हनीफने दिला. मात्र त्याच्याच घरात निदा खानने वास्तव्य केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याला या प्रकरणात संशयित आरोपी करण्यात आले असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.


कॉर्पोरेट जिहाद प्रकरणात वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये आरोपपत्र दाखल झाल्यानंतर एसआयटीने या प्रकरणाचे राजकीय धागेदोरे उलगडण्यासाठी सोमवारी गुन्हे शाखेच्या कार्यालयात संभाजीनगरचा एमआयएम नगरसेवक मतीन पटेल, घरमालक हनीफ शेख या दोघांची दुसऱ्यांदा तब्बल ८ तास मॅरेथॉन चौकशी झाली. यापूर्वी २५ मे रोजीही या दोघांची १० तास चौकशी झाली होती. तेव्हा मतीन पटेलचा मोबाईल फोनदेखील एसआयटीने जप्त केला होता. त्यावेळी त्याने 'बडे साब' यांनी फोन केल्याने आपण घर दिले, आपणही निदा खान कोण? हे ओळखत नसल्याचे सांगितले होते.

## ऋषिकेश जैस्वालांना शिवीगाळ; शिवसैनिकांचा एकाला चोप:शहागंजमध्ये अतिक्रमण कारवाईवरून राडा

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** शहागंज भागात महानगरपालिकेच्या अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान जोरदार राडा झाला. मनपाचे पथक कारवाई करत असताना अचानक काही हातगाडी चालक आणि दुकानदार आक्रमक झाले. त्यांनी पथकावर धावून जात थेट संघर्षाची भूमिका घेतली. या गोंधळात संतप्त व्यापाऱ्यांनी मनपा कर्मचाऱ्यांना अद्वातद्वा शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. नगरसेवक ऋषिकेश जैस्वाल यांनाही या व्यापाऱ्यांनी लक्ष्य करत शिवीगाळ केली. दरम्यान याप्रकरणी रात्री उशिरा सिकंदर नामक व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला.

या राड्याचे पडसाद रात्री उशिरापर्यंत उमटत राहिले. आपल्या नेत्याला झालेल्या शिवीगाळीची बातमी पसरताच ऋषिकेश जैस्वाल यांचे कार्यकर्ते जुन्या शहरात गोळा झाले. त्यामुळे मध्यरात्री शहागंज परिसरात दोन्ही गट आमनेसामने येण्याची चिन्हे निर्माण झाली आणि वातावरण कमालीचे तापले. शिवीगाळ करणाऱ्याला कार्यकर्त्यांनी चोप दिला. यावेळी माफी मागत असल्याचा व्हिडीओ देखील व्हायरल झाला आहे. या राड्याचे पडसाद रात्री उशिरापर्यंत उमटत राहिले. आपल्या नेत्याला झालेल्या शिवीगाळीची बातमी पसरताच ऋषिकेश जैस्वाल यांचे कार्यकर्ते जुन्या शहरात गोळा झाले. त्यामुळे मध्यरात्री शहागंज परिसरात दोन्ही गट आमनेसामने येण्याची चिन्हे निर्माण झाली आणि वातावरण कमालीचे तापले. शिवीगाळ करणाऱ्याला कार्यकर्त्यांनी चोप दिला. यावेळी माफी मागत असल्याचा व्हिडीओ देखील व्हायरल झाला आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली.




# ‘भंते संघपाल’ एक सच्चे बुद्ध - भीमानुयायी

**"जीवन स्वतःसाठी जगणे सोपे असते,पण समाजासाठी, धम्मासाठी आणि मानवतेसाठी जगणे म्हणजेच खरे जीवन सार्थकत्व असते!" बौद्ध धम्माच्या चळवळीच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की ज्यांचे संपूर्ण आयुष्यच एका संदेशाचे रूप घेते.त्यांचे प्रत्येक पाऊल समाजाला दिशा देते. प्रत्येक संघर्ष प्रेरणा देतो आणि प्रत्येक त्याग इतिहास घडवितो.असेच एक विलक्षण व्यक्तिमत्त्व म्हणजे पूर्वाश्रमीचे आयुष्मान उत्तमराव म्हस्के आणि आजचे आदरणीय भंते संघपाल. आज वयाच्या ८७ व्या वर्षीही बुद्ध,धम्म,संघ, फुले-शाहू-आंबेडकर विचार आणि मानवमुक्तीच्या चळवळीसाठी अखंड कार्यरत असलेले भंते संघपाल हे आधुनिक काळातील एक लढाऊ धम्मयोद्धे आहेत. त्यांच्या जीविताची सुरुवात गरीब कुटुंबातील संघर्षमय प्रसंगांनी झाली.**





उत्तमराव म्हस्के यांचा जन्म अर्जुनराव म्हस्के व भारजाबाई म्हस्के या दाम्पत्याच्या घरात २ जून १९३९ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड-राजा येथे झाला.घरची परिस्थिती सामान्य,आर्थिकदृष्ट्या अत्यंत हलाखीची होती.जीवनाच्या वाटेवर सुविधा नव्हत्या,संधी कमी होत्या आणि संघर्ष मात्र भरपूर होता.परंतु त्यांनी परिस्थितीला शरण न जाता तिच्याशी दोन हात केले.शिक्षणासाठी अनेक संकटांचा सामना केला. अभाव,उपासमार,आर्थिक अडचणी आणि सामाजिक विषमता यांवर मात करत त्यांनी उच्च शिक्षण प्राप्त केले आणि महसूल विभागाच्या शासन सेवेत प्रवेश करून ज्युनिअर क्लार्क,सिनिअर क्लार्क पासून नायब तहसीलदार पदापर्यंत मजल मारली. त्यांच्या आयुष्यातील हा प्रवास केवळ वैयक्तिक यश नव्हता,तर हजारो वंचित तरुणांसाठी प्रेरणेचा दीपस्तंभ होता.शासकीय सेवेत असताना त्यांनी सत्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि लोकाभिमुखता यांची कधीही तडजोड केली नाही.नोकरी म्हणजे केवळ वेतन मिळविण्याचे साधन नसून लोकसेवेचे माध्यम आहे,या भावनेतून त्यांनी काम केले.स्वतःच्या कुटुंबातील सदस्यांना,नातेवाईकांना आणि अनेक गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करून त्यांचे आयुष्य घडविले.अनेक कुटुंबांच्या जीवनात ते आधारवड ठरले.लोक त्यांना प्रेमाने "बाबूसाहेब" म्हणत. पुढे त्यांच्या सामाजिक कार्यामुळे त्यांना "रावसाहेब" आणि "दीनबंधू" अशी सन्माननीय पदव्या लाभल्या.बौद्ध धम्म आणि सामाजिक चळवळीत त्यांनी अविरत कार्य केले आहे.महसूल सेवेत कार्यरत असतानाच त्यांनी सामाजिक आणि धम्मकार्याला वाहून घेतले.अकोला जिल्ह्यातील तेल्हारा आणि बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा,मलकापूर, तालुक्यात त्यांनी जवळपास ७९ महिला मंडळे आणि युवक मंडळे स्थापन करून ग्रामीण भागात जागृतीचे अभूतपूर्व कार्य केले.ते दिवसभर सरकारी कामकाज आणि रात्री धम्मप्रचार करीत.गावोगावी फिरणे,झोपड्यांत मुक्काम करणे,जे मिळेल ते खाणे, लोकांना बुद्ध-आंबेडकर विचार समजावून सांगणे आणि पहाटे पुन्हा कार्यालयात हजर होणे,ही त्यांची दिनचर्या होती. त्यांच्या आयुष्याचा हा भाग आठवला की महाकवी वामनदादा कर्डक यांचे शब्द आठवतात —

*"तुफानातले दिवे आम्ही,*
*तुफानातले दिवे...*
*तुफान,वारा,पाऊसधारा,*
*मुळी ना आम्हा शिवे!"*

खरंच,उत्तमराव म्हस्के हे अशाच तुफानातील दिव्यांपैकी एक होते. उत्तमराव म्हस्के म्हणजे संघर्षशील आंदोलनकर्ता होय.मराठवाडा विद्यापीठाला विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याचे नामांतर आंदोलन असो... महाराष्ट्रात गाजलेले रिडल्स इन हिंदुझम आंदोलन असो... विदर्भातील भूमिमुक्ती चळवळ असो...प्रत्येक सामाजिक आणि वैचारिक संघर्षात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांचा विश्वास स्पष्ट होता, "तथागत बुद्धांचा वैज्ञानिक धम्म आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवमुक्तीचे विचारच भारताला समतेच्या मार्गावर, विकासाच्या पथावर नेऊ शकतात." जातीयवाद,अंधश्रद्धा,विषमता आणि मानवी शोषण यांच्या विरोधात त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांनी वयाच्या ७८ व्या वर्षी घेतलेला महत्त्वपूर्ण निर्णय त्यांना आणखी व्यापक कार्य करण्यासाठी सहाय्यभूत ठरला.बहुतेक लोक या वयात विश्रांती,आराम आणि कौटुंबिक सुख शोधतात. परंतु उत्तमराव म्हस्के यांनी वेगळाच मार्ग निवडला. २०१६ मध्ये वयाच्या ७८ व्या वर्षी त्यांनी घर,कुटुंब,संपत्ती, सांसारिक मोह आणि ऐहिक सुखांचा त्याग करून बौद्ध संघाची दीक्षा घेतली.ते तथागत गौतम बुद्धांच्या भिख्खू संघात प्रवज्जित झाले. उत्तमराव म्हस्के यांचे रूपांतर झाले... भंते संघपाल यांच्या मध्ये! हे केवळ नाम परिवर्तन नव्हते... ते एका सांसारिक गृहस्थाचे विनयशील भिक्खू संघामध्ये झालेले परिवर्तन होते. त्याग म्हणजे काय असतो,हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले.भिख्खू संघात दीक्षा घेतल्यावर धम्मप्रसारासाठी अखंड भ्रमंती केली. भंते संघपाल झाल्यानंतर त्यांचा उत्साह आणखी द्विगुणित झाला. वयाच्या ७८ व्या वर्षी ४४ दिवस सलग ग्रामीण भागात धम्मप्रचारासाठी फिरणे, गावोगावी जनजागृती करणे, बुद्ध आणि बाबासाहेबांचा संदेश पोहोचविणे हे कार्य त्यांनी केले. आजही त्यांच्या चालण्यात तरुणालाही लाजवेल अशी ऊर्जा दिसते. बुद्धगया मुक्ती आंदोलनातील त्यांचा प्रेरणादायी सहभाग होता. २०२५ मध्ये भंते विनाचार्य यांच्या नेतृत्वाखाली बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी निघालेल्या धम्मध्वज यात्रेत ८६ वर्षीय भंते संघपाल यांचा सहभाग संपूर्ण आंदोलनाचे आकर्षण ठरला. दीक्षाभूमी नागपूर ते चैत्यभूमी मुंबई आणि पुढे मध्यप्रदेशापर्यंतच्या जनजागृती यात्रेत त्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.लोक त्यांच्या पावलांकडे पाहत होते. वृद्ध शरीर थकले होते... पण धम्मासाठीची जिद्द अजूनही तरुण होती. त्यांना चालताना पाहून अनेकांच्या डोळ्यांत अश्रू दाटून आले.कारण ते फक्त चालत नव्हते... ते इतिहासाच्या दिशेने चालत होते. ते संघर्षाच्या परंपरेला पुढे नेत होते. ते बुद्धगयेच्या मुक्तीचे स्वप्न आपल्या पावलांत घेऊन चालत होते. एका पुत्रासाठी वडील म्हणजे आधार असतात.परंतु जेव्हा तेच वडील संपूर्ण समाजाचे होतात,तेव्हा अभिमानासोबत विरहही येतो. त्यांचे पूर्वाश्रमीचे पुत्र उज्वलकुमार यांनी आपल्या पूर्वाश्रमीच्या वडिलांविषयी लिहिलेली ओळ मनाला स्पर्शून जातात, "बुद्ध की राह पर.... धम्म के पथ पर.... संघ के सन्मान पर.... फुले- शाहू- आंबेडकरजी के विचारो पर... मानवी कल्याण के मार्ग पर..... समता,मानवता,बंधुता निर्माण के हेतू..... वे निरंतर चलते हैं..." खरंच... घर सोडले, संपत्ती सोडली, आराम सोडला, पण मानवतेचा मार्ग नाही सोडला. धम्माचा दीप नाही विझू दिला. "ज्याने स्वतःचे जीवन समाजासाठी अर्पण केले,त्यांना प्रतिकूल परिस्थितीही हरवू शकत नाही." "त्यागातून निर्माण होणारी शक्ती ही कोणत्याही सत्तेपेक्षा मोठी असते." "समाजाला विचार देणारा माणूस शतकानुशतके जिवंत राहतो." "धम्माचा मार्ग चालणाऱ्याचे पाऊल कधीच व्यर्थ जात नाही." सफर में धूप तो होगी,तो चल सको तो चलो, सभी हैं भीड़ में,तुम भी निकल सको तो चलो। अखेर... भंते संघपाल यांचे जीवन म्हणजे त्याग,संघर्ष,सेवा, धम्मनिष्ठा आणि मानवतेची अखंड गाथा आहे. त्यांनी स्वतःसाठी काही मागितले नाही,परंतु समाजाला विचार,प्रेरणा आणि दिशा दिली. आज त्यांच्या जीवनाकडे पाहताना एकच भावना मनात निर्माण होते, "काही माणसे इतिहास वाचत नाहीत,ती स्वतः इतिहास घडवितात." भंते संघपाल हे अशाच इतिहास घडविणाऱ्या व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. तथागत बुद्ध,विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि समस्त बहुजन महापुरुषांच्या विचारांचा दीप हातात घेऊन... ते आजही चालत आहेत... होय,ते आजही निरंतर चालत आहेत......!

**@उज्वलकुमार भारतीय.**
**छत्रपती संभाजीनगर.**
**भ्रमणध्वनी -9284530492.**

# लोकसंपादक!

## महापुरुषांच्या वैचारिक प्रकाशात, शून्यातून स्वतःचे आभाळ निर्माण करणारा

**अवतीभवतीचा काळ मोठा कठीण आला आहे. मूल्यं बाजारात विकली जात आहेत कआणि पत्रकारितेचे संदर्भ रोज बदलत आहेत. अशा या गढूळ आणि वादळी हवामानात, स्वतःची पाळेमुळे मातीत घट्ट रोवून, तत्त्वांशी तडजोड न करता ताठ कण्याने उभा असलेला माणूस पाहिला की विझत चाललेल्या आशेला पुन्हा अंकुर फुटतात. ज्या जगात 'नेतृत्व' आणि 'प्रतिष्ठा' अनेकदा वारसा हक्काने मिळणारी जहागीर असते, तिथे पाठीवर कोणाचाही वरदहस्त नसताना, देऊळगाव माळी सारख्या एका छोट्याशा खेड्यातून प्रवास सुरू करून, केवळ स्वतःच्या जिद्दीच्या आणि लेखणीच्या बळावर पत्रकारितेचे एक अढळ साम्राज्य निर्माण करणे हा एक चमत्कारच आहे. हा वैचारिक चमत्कार घडवणारे माझे अझिझ दोस्त, 'दैनिक बातमीजगत'चे मुख्य संपादक आणि 'दैनिक लोकमंथन'चे (बुलढाणा जिल्हा आवृत्ती) संपादक कैलासभाऊ राऊत यांचा आज जन्मदिवस!**

कैलासभाऊंच्या या दोन दशकांच्या अथक प्रवासाकडे पाहताना मनात एक शेर गुंजतो

"जमीन सख्त थी और आसमां भी दूर था,*
मगर वो शक्स अंधेरों में भी पुरनूर था..."


हा प्रवास केवळ एका व्यक्तीचा नाही, तर शून्यातून स्वतःचे आभाळ निर्माण करणाऱ्या एका ध्येयवादी संपादकाचा जिवंत दस्तऐवज आहे. कैलासभाऊंचा जीवनप्रवास म्हणजे आगीतून तावून-सुळावून निघालेले चोख सोने आहे. आदरणीय वडील हरीभाऊ राऊत (शासनाने सन्मानित केलेले मूर्तिकार व शिल्पकार) आणि आई स्व. शांताबाई राऊत यांच्या कष्टाचे, प्रामाणिकपणाचे आणि निष्ठेचे संस्कार त्यांच्या रक्तात वाहतात. घरात कुंभारकामाचा पारंपरिक व्यवसाय. आव्यातील कच्च्या मातीला आणि निखाऱ्याला साक्ष ठेवून स्वतःच्या जगण्याला कष्टाचा आकार देण्याचे कसब त्यांनी बालवयातच शिकले. डोक्यावर मडकी आणि मातीची भांडी घेऊन, पायाला भिंगरी लावल्यासारखे गावागावात फिरणारा तो छोटा कैलास, परिस्थितीचे चटके सोसत होता; पण मनातला स्वाभिमान त्याने कधी मळू दिला नाही. शिक्षणाची आस इतकी अथांग होती की, जेव्हा ते महाविद्यालयीन शिक्षणासाठी खामगावात आले, तेव्हा उदरनिर्वाहासाठी त्यांनी हॉटेलमध्ये काम केले, चहा विकला. लोक म्हणतात चहा विकणारी माणसे केवळ सत्तेच्या शिखरावर पोहोचतात; पण चहा विकता विकता विचारांनी समृद्ध होऊन पत्रकारितेचा एक अथांग पर्वत उभा राहू शकतो, याचे जिवंत आणि देखणे उदाहरण म्हणजे कैलासभाऊ राऊत! २००३ साली आपले आदरणीय गुरु पंढरीनाथ देवकर आणि गणेश निकम केळवदकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पत्रकारितेचा पहिला धडा गिरवला. खामगावच्या 'सांज दैनिक प्रश्नकाल'पासून सुरू झालेली ही लेखणी आज 'दैनिक बातमीजगत' आणि 'दैनिक लोकमंथन' या नामांकित वृत्तपत्रांचे मुख्य संपादक म्हणून सक्षमपणे नेतृत्व करत आहे. कैलासभाऊ हे वातानुकूलित केबिनमध्ये बसून कोरडे शब्द लिहिणारे संपादक नाहीत. त्यांच्या लेखणीला शिव, शाहू, फुले आणि आंबेडकरांच्या विचारधारेची धार आहे. गेल्या १५ वर्षांत त्यांनी तळागाळातील, शोषित आणि उपेक्षित गोरगरिबांच्या न्यायासाठी प्रशासनाशी थेट दोन हात केले. अनेकदा आंदोलने केली, तर कधी आत्मदहनाचा इशारा देऊन शेवटच्या माणसाला त्याचा हक्क मिळवून दिला. पत्रकारांच्या सन्मानासाठी 'मराठी पत्रकार परिषद', 'व्हाईस ऑफ मीडिया', 'स्वराज्य पत्रकार संघ' आणि 'महाराष्ट्र राज्य ग्रामीण पत्रकार संघ' या माध्यमांतून ते नेहमीच रस्त्यावरच्या लढाईत आघाडीवर राहिले आहेत. त्यांच्या या निर्भीड आणि प्रामाणिक पत्रकारितेची दखल घेऊन समाजाने त्यांना ११४ पेक्षा जास्त पुरस्कारांनी नवाजले आहे, तर ३० पेक्षा जास्त सामाजिक संघटनांवर ते मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहे. कैलासभाऊंवर वाचन संस्कृतीचा इतका प्रभाव आहे की, त्यांच्या उंबरठ्यावर येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला ते 'पुस्तक' सप्रेम भेट देतात. बंदुकीच्या गोळीपेक्षा किंवा पैशाच्या सत्तेपेक्षा 'विचारांची चळवळ' समाज बदलू शकते, या सूफी विचारावर त्यांचा गाढा विश्वास आहे. स्वभावाने अत्यंत सुस्वभावी, संयमी, निर्व्यसनी आणि विनयशील असणारे कैलासभाऊ दोस्तीच्या दुनियेतले 'सुलतान' आहेत. मित्रांवर नितांत प्रेम करणे आणि सवंगड्यांच्या सुखासाठी स्वतःला झिजवणे हा त्यांचा उपजत स्वभाव आहे. गावाकडील मित्रांचे जगणे सुधारावे म्हणून 'सिद्धिविनायक स्वयं सहाय्यता बचत गटांच्या' माध्यमातून त्यांनी केलेले कार्य त्यांच्यातील संवेदनशील समाजसेवकाची साक्ष देते. सर्वांच्या सुख-दुःखात धावून जाणारे कैलासभाऊ हे खऱ्या अर्थाने माणसांच्या प्रेमाचे गर्भश्रीमंत आहेत. त्यांच्या या एकूणच सुसंस्कृत आणि लढाऊ प्रवासाला सलाम करताना मला म्हणावंसं वाटतं:

***"हवाओं ने बहुत कोशिश की मगर वो चिराग बुझा नहीं,***
***जिसने अंधेरों से बगावत की, वो कभी झुका नहीं..."***

अशा या दिलदार, संवेदनशील आणि महाराष्ट्राच्या पत्रकारितेतील निर्भीड शिलेदाराला वाढदिवसाच्या अथांग सदिच्छा! कैलासभाऊ, तुमची ही लेखणी अशीच अन्यायाविरुद्ध मशाल बनून जळत राहो आणि तुमच्या हातून जनसामान्यांची अशीच अखंड सेवा घडो, हीच त्या निर्मिकाकडे प्रार्थना! आपण औक्षवंत व्हावे, यशवंत व्हावे, कीर्तिवंत व्हावे!

**महेंद्र बोर्डे ,**
**ज्येष्ठ पत्रकार,**
**बुलढाणा**





## गोड बाहुली...

निरागस निर्मळ
माझी गोड बाहुली
प्रेमळ नजरेत भासे
हुबेहूब माय माऊली....

हास्य तिचे मधूर
रूप दिसे सोज्वळ
सुखी समाधानाने
रित्त नसे ओंजळ....

साजिरी गोजिरी
हसताच पडे खळी
खळखळ हसताच
कानातील डुले बाळी.....

रुपवान माझी बाहुली
लाखात एक असे
मिचकावत डोळ्यांत
राधा कृष्ण दिसे....

लांबसडक केसांत
माळे सुवासिक गजरा
गुदगुदल्या करताच
हसरा होई चेहरा...

गोऱ्या गोऱ्या रंगात
सोनपरी दिसे तेजस्वी
बोलक्या डोळ्यांनी
स्मितहास्य करे मनस्वी....

**सौ. स्नेहा मुकुंद शिंपी**
**नाशिक**

बातमीजगत हे पत्र मालक, प्रकाशक, कैलास हरीभाऊ राऊत यांनी मुद्रक श्रीकृपा प्रिंटर्स, मुद्रण स्थळ जपान जिन जवळ, दगडी पुल, अकोला जि. अकोला 444002 (M. S.) येथून मुद्रित करून -कार्यालय : बातमीजगत कार्यालय, देऊळगाव माळी ता. मेहकर जि. बुलडाणा (M. S.) येथून प्रकाशित केले. संपादकः कैलास हरीभाऊ राऊत मो. 9561596693 प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार राहतीलच असे नाही.) सर्व वाद विवाद मेहकर न्यायालयांतर्गत राहील.) RNI No . MHBIL/25/A1435

This newspaper is printed by the owner, publisher, Kailas Haribhau Raut, printer Shrikripa Printers, printing place near Japan Jin, Dagdi Pul, Akola Dist. Akola 444002 (M. S.) and published from -Office: News Jagat Office, Deulgaon Mali Tal. Mehkar Dist. Buldana (M. S.). Editor: Kailas Haribhau Raut Md. 9561596693 The editor does not necessarily agree with the published articles and news. (The editor is not necessarily responsible according to the P. R. B. Act.) All disputes will be subject to Mehkar Court.) RNI No. MHBIL/25/A1435

## घटना-घडामोडी

### मुंबई-गोवा महामार्गावरील भीषण अपघात; डंपरच्या धडकेत दोन दुचाकीस्वारांचा मृत्यू पेण प्रतिनिधी किरण बांधनकर

**बातमी जगत | प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील खारपाडा परिसरात ३० मे रोजी रात्री एक भीषण अपघात झाला. गौण खनिज वाहून नेणाऱ्या एका भरधाव डंपरने दुचाकीला जोरदार धडक दिली, ज्यामध्ये दोन तरुणांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. आदित्य किशोर बल्लाळ वाडकर (वय २२) आणि यश मुकेश बल्लाळ (वय १२) अशी मृतांची नावे असून, ते मुंबईतील विक्रोळी परिसरातील रहिवासी होते. डंपर चालकाने वाहन अतिवेगाने आणि बेदरकारपणे चालवल्याने त्याचे नियंत्रण सुटले आणि हा अपघात घडला. याप्रकरणी डंपर चालक गौतम लक्ष्मण महतो (रा. झारखंड) याच्याविरुद्ध दादर सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर संतप्त स्थानिक ग्रामस्थ आणि नातेवाईकांनी सुमारे दीड तास मृतदेह रस्त्यावरून उचलण्यास नकार दिला. बेकायदेशीर गौण खनिज वाहतुकीला पेण उपप्रादेशिक परिवहन विभाग (RTO) आणि महसूल विभाग जबाबदार असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला .मनसेचे रायगड जिल्हा अध्यक्ष बाळा म्हात्रे आणि मनसे नेते दिलीप पाटील यांनीही घटनास्थळी धाव घेत, या विभागातील दोषी अधिकाऱ्यांविरोधात मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी आक्रमक मागणी केली आहे. या अपघातामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक सुरक्षा आणि वाढत्या अपघातांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. दादर सागरी पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

### पार्थ पवार राजकारणात सक्रिय झाले चांगली गोष्ट:अजितदादांच्या निधनापूर्वी राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा झाली; सुनील तटकरे काय म्हणाले?

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**मुंबई :** राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे नेते सुनील तटकरे यांचे सुपुत्र अनिकेत तटकरे यांना विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी जाहीर करण्यात आली असून आज त्यांचा अर्ज भरण्यात आला आहे. त्यानंतर सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषद घेत अनेक विषयांवर भाष्य केले आहे. यावेळी बोलताना त्यांनी राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा अजितदादा असताना झाल्याचेही म्हटले आहे. तसेच अजितदादांच्या विमान अपघातावरही भाष्य केले आहे. सुनील तटकरे म्हणाले, अजितदादांच्या निधनानंतर पार्थ पवार सक्रिय होणे पक्षासाठी महत्त्वाचे होते म्हणून त्यांनी निर्णय घेतला आणि योग्य आहे. शेवटी संघटनेत काम करत असताना वेगवेगळी मते असू शकतात. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना 1999 साली झाली. पवार साहेबांसारखे 6 दशक देशाच्या राजकारणात एक प्रभाव असणारे नेतृत्व मिळाले. तसेच पक्षात लोकशाही पद्धतीने निर्णय घेतले जायचे. त्यामुळे साहेबांची सुद्धा निर्णय घेण्याची प्रक्रिया सुद्धा तशीच होती. अजितदादांनी देखील तीच पद्धत पुढे चालू ठेवली. प्राजक्त तनपुरे यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यासाठी बैठका झाल्याचा गौप्यस्फोट केला होता. यावर बोलताना सुनील तटकरे म्हणाले, यात गौप्यस्फोट काही नाही. ही वस्तुस्थिती आहे. अजितदादांचा निधानापूर्वी दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चा झाल्या होत्या, ही बाब मी सुद्धा नंतर सांगितली आहे. काही बैठकांना मी नव्हतो, पण बैठकीतले तपशील मला दादा सांगायचे. त्यामुळे फार मोठा गौप्यस्फोट प्राजक्त तनपुरे यांनी केला असे काही नाही. प्रत्येक निवडणुकीला उमेदवारी जाहीर अगदी काही तास शिल्लक असताना केली जाते, असे का होते? यावर बोलताना सुनील तटकरे म्हणाले, जेव्हा तीन पक्ष एकत्र निवडणुका लढवत असतात, तेव्हा जागावाटपावर चर्चा होत असते. काही जागांच्या बाबतीत प्रत्येक राजकीय पक्षाचे एक गणित असते ते मांडले जाते. तसेच सगळ्याच बाबतीत एकमत होत असते असे नाही. एनडीएमध्ये आमच्याकडे एक मोठे नेतृत्व आहे, त्या नेतृत्वाकडे अनेकवेळेला अनेक प्रश्न जात असतात. अमित शहा तिथे पूर्ण नियंत्रण करत असतात, ते सर्वांनाच अतिशय समान पद्धतीने न्याय देण्याचा प्रयत्न करत असतात. यात कधी वेळ लागत असतो. कॉंग्रेसवर टीका करताना सुनील तटकरे म्हणाले, आता त्यांना हातातोंडाशी आलेले गेले असे वाटत असेल, एक बघा चंद्रपूर महापालिकेत कॉंग्रेस पक्षाला बहुमत होते. आता कॉंग्रेस पक्षांतर्गत काय चालू आहे, मला माहीत आहे. पण त्यावर मला बोलावे असे वाटत नाही. पण बहुमत असताना सुद्धा ते त्यांचा महापौर करू शकले नाहीत. आता त्यावेळेला त्यांचा महापौर होऊ शकला नाही, त्यांनी काळाच्या ओघात जसा सूड उगवला जातो, तसा तो उगवला गेला की काय आणि त्याच्यातून जर काही नगरसेवक नॉट रिचेबल असतील तर प्रत्येकाने आत्मपरीक्षण, आत्मचिंतन करावे, असा खोचक सल्ला तटकरे यांनी दिला आहे. अजित पवारांच्या अपघाताला 5 महीने उलटून गेले, मात्र अद्यापही हा घात आहे की अपघात याचे उत्तर अजूनही मिळाले नाही. यावर बोलताना सुनील तटकरे म्हणाले, अशा पद्धतीचे विमान अपघात होतात, तर त्याच्या चौकशीची एक पद्धती केंद्र पातळीवर नक्की करण्यात आली आहे.

## पान एक वरून

चित्रपट निर्माता आणि फिल्म फेडरेशन ऑफ इंडिया (FFI) चे माजी अध्यक्ष टीपी अग्रवाल यांनी चित्रपट संघटनांकडून कलाकारांवर लादल्या जाणाऱ्या बंदीविरोधात न्यायालयात धाव घेतली आहे. अग्रवाल यांनी मुंबईतील दिंडोशी दिवाणी न्यायालयात फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉइज (FWICE) आणि इंडियन मोशन पिक्चर प्रोड्यूसर्स असोसिएशन (IMPPA) यांच्या विरोधात याचिका दाखल केली आहे. त्यांचे म्हणणे आहे की, कोणत्याही संस्थेकडे कोणत्याही कलाकाराला काम करण्यापासून रोखण्याचा किंवा असहकार्याचा (नॉन-कोऑपरेशन) निर्देश जारी करण्याचा कायदेशीर अधिकार नाही. न्यायालयाने दोन्ही संघटनांना नोटीस बजावली आहे. बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंह यांच्या विरोधात नॉन-कोऑपरेशन म्हणजेच असहयोगाचा निर्देश जारी केला होता. रणवीर सिंहच्या प्रोडक्शन हाऊस एक्सेल एंटरटेनमेंटसोबत 'डॉन 3' चित्रपट सोडल्यापासून वाद सुरू आहे.

✦ मेहकर येथील आमदार संपर्क कार्यालयात विशेष बैठक; टँकर. विहीर अधिग्रहण व तातडीच्या उपाययोजनांबाबत प्रशासनाला स्पष्ट निर्देश

# आमदार सिद्धार्थ खरात यांचा पाणीप्रश्नावर तातडीचा आढावा

**बातमी जगत | प्रतिनिधी**



**मेहकर :** उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे मेहकर व लोणार तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर आमदार सिद्धार्थ खरात यांनी मेहकर येथील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जनसंवाद आमदार संपर्क कार्यालयात विशेष आढावा बैठक घेत प्रशासनाला तात्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी कोणत्याही प्रकारचा त्रास सहन करावा लागू नये, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने राबविण्याचे आदेश यावेळी देण्यात आले. बैठकीत मेहकर व लोणार तालुक्यातील पाणीपुरवठ्याची सद्यस्थिती, टँकरद्वारे सुरू असलेला पुरवठा, अधिग्रहित करण्यात आलेल्या विहिरी तसेच पाणीटंचाईग्रस्त गावांमधील अडचणींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी एबीडीओ संदीप मेटागळे यांच्यासह पंचायत समिती व संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आढावा बैठकीत देण्यात आलेल्या माहितीनुसार, मेहकर तालुक्यात सध्या 13 ठिकाणी टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत असून 53 विहिरी अधिग्रहित करून गावांना पाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे. ज्या गावांमध्ये पुढील काही दिवसांत पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे, त्या ठिकाणीही पूर्वतयारी ठेवण्याचे निर्देश आमदार खरात यांनी दिले. घाटबोरी, वरूड, नांद्रा धांडे तसेच इतर काही गावांतील नागरिकांनी पिण्याच्या पाण्याच्या समस्येबाबत आमदार खरात यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत संबंधित गावांमध्ये तातडीने पाहणी करून आवश्यकतेनुसार विहिरी अधिग्रहित करणे किंवा टँकर सुरू करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या.

यावेळी आमदार खरात म्हणाले की, मेहकर मतदारसंघातील एकाही गावाला पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहू देणार नाही. ज्या ठिकाणी समस्या निर्माण होईल त्या ठिकाणी प्रशासनाने तात्काळ उपाययोजना कराव्यात. पिण्याचे पाणी हा नागरिकांचा मूलभूत हक्क असून त्यासाठी निधी, यंत्रणा किंवा प्रशासकीय प्रक्रियेची अडचण येऊ दिली जाणार नाही. तसेच त्यांनी नागरिकांना आवाहन केले की, ज्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची अडचण आहे किंवा नागरिकांना पाण्यासाठी दूरवर भटकंती करावी लागत आहे, त्यांनी सरपंच. ग्रामसेवक किंवा संबंधित प्रशासनामार्फत तात्काळ गटविकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. आवश्यक असल्यास आमदार कार्यालयालाही माहिती द्यावी, जेणेकरून तातडीने उपाययोजना करता येतील.बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांना पाणीटंचाईग्रस्त गावांवर सतत लक्ष ठेवण्याच्या, नागरिकांच्या तक्रारींना तत्परतेने प्रतिसाद देण्याच्या आणि कोणत्याही गावात पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर होण्यापूर्वीच आवश्यक उपाययोजना करण्याच्या स्पष्ट सूचना आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिल्या.

मेहकर व लोणार तालुक्यातील पाणीपुरवठा सुरळीत राहावा आणि नागरिकांना उन्हाळ्यात कोणताही त्रास होऊ नये, यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधी समन्वयाने काम करत असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर भयंकर अपघात!

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**मुंबई :** महाराष्ट्रात गेल्या 24 तासांत अपघाताच्या दोन वेगवेगळ्या भीषण घटना समोर आल्या आहेत. एका घटनेत मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर कंटेनर आणि ट्रक यांच्यात झालेल्या जोरदार धडकेत दोघांचा जागीच मृत्यू झाला असून एक वृद्ध महिला गंभीर जखमी झाली आहे. तर दुसऱ्या घटनेत अंबरनाथ-उल्हासनगर मार्गावर मध्यरात्री एका भरधाव कारने धुमाकूळ घालत अनेकांना धडक देऊन जखमी केले.

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर आज (दिनांक 01 जून) पहाटे 4.30 च्या सुमारास खोपोलीनजीक एक भीषण अपघात झाला आहे. पुण्याहून मुंबईकडे तेलाचे डबे घेऊन जाणारा एक भरधाव कंटेनर चलकाचे नियंत्रण सुटल्याने मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर उलटला. कंटेनर उलटला तेव्हा मागून तांदूळ घेऊन जाणारा एक ट्रक वेगाने येत होता. वेग जास्त असल्याने ट्रक चालकाला वाहन कंट्रोल करता आले नाही आणि हा ट्रक थेट उलटलेल्या कंटेनरवर जाऊन धडकला. ही धडक इतकी भीषण होती की ट्रकमधील चालक आणि क्लीनरचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या दोन अवजड वाहनांच्या भीषण धडकेच्या कचाट्यात बाजूने जाणारी एक एर्टिगा कारही सापडली असून, कारमधील 80 वर्षीय वृद्ध महिला गंभीर जखमी झाल्याने त्यांना तत्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघातामुळे मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक तब्बल दोन तास पूर्णपणे ठप्प झाली होती. मात्र, हायवे पोलिस आणि बचाव पथकाने युद्धपातळीवर प्रयत्न करत अपघातग्रस्त वाहने बाजूला हटवून वाहतूक पुन्हा सुरळीत केली.

## भव्य मिरवणूक, ढोल-ताशांचा गजर अन् समाजबांधवांचा उत्स्फूर्त सहभाग

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ **संदीप पळसकर**



**डोणगाव :** लोककल्याणकारी राज्यकारभार, न्यायप्रियता आणि समाजसेवेचा आदर्श निर्माण करणाऱ्या राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त डोणगाव येथे मल्हार सेना व सर्व धनगर समाजाच्या वतीने भव्य आणि उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दिवसभर विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांनी सजलेल्या या जयंती सोहळ्याने संपूर्ण गाव भक्तिमय व प्रेरणादायी वातावरणाने भारावून गेले.

सकाळी राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्याचे व प्रतिमेचे विधिवत पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून राजमातांच्या कार्याला अभिवादन केले. यावेळी समाजातील ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक, सामाजिक कार्यकर्ते व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुपारी चार वाजता राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या भव्य शोभायात्रेला प्रारंभ झाला. ढोल-ताशांचा दणदणाट, पारंपरिक वाद्यांचा निनाद, भगवे ध्वज आणि "जय मल्हार"च्या घोषणांनी संपूर्ण डोणगाव दुमदुमून गेले. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या युवकांनी मिरवणुकीचे आकर्षण वाढवले, तर महिला भगिनींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे सोहळ्याला विशेष रंगत प्राप्त झाली. गावातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आलेल्या या शोभायात्रेचे अनेक ठिकाणी पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. नागरिकांनी राजमातांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होत त्यांच्या लोकहितवादी कार्याचा गौरव केला. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या या मिरवणुकीत विविध सामाजिक संघटना, युवक मंडळे आणि समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या विचारांचा जागर करत समाजात एकता, बंधुता आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमात शिस्तबद्ध नियोजन, उत्साह आणि समाजातील ऐक्याचे दर्शन घडले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मल्हार सेना, सर्व धनगर समाज, युवक मंडळे, महिला आघाडी तसेच समाजातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. जयंती सोहळ्यामुळे डोणगाव परिसरात भक्ती, प्रेरणा आणि सामाजिक एकात्मतेचे अनोखे वातावरण निर्माण झाले होते.

## पैसे देण्यास नकार दिला म्हणून पती-पत्नीला केली मारहाण

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ **प्रा.ज्ञानेश्वर बनसोडे**

**अहिल्यानगर :** आईला नगर जिल्ह्यातील राहुरी कृषी विद्यापीठ या ठिकाणी ही घटना घडली आहे.

पैशाची मागणी केली असता पैसे देण्यास नकार दिला. याचा राग आल्याने आरोपींनी दोघा पती पत्नीला काठी व रॉडने मारहाण करून केल्याची घटना दिनांक 30 मे रोजी राहुरी कृषी विद्यापीठ येथे घडली आहे. कुंदन पाटीलबा बाचकर(वय २८. रा.गोटुंबेआखाडा ता. राहुरी) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीमध्ये असे म्हटले आहे की दिनांक ३०मे २०२६रोजी सकाळी ठीक ६: ४५ चे दरम्यान कुंदन बाचकर यांना अहिल्यानगर येथे आपल्या कामानिमित्त जायचे असल्याने ते राहुरी कृषी विद्यापीठ बस स्टॉप येथे बसची वाट पाहत उभे होते. येथील हॉटेलवाला मनोज तट हा तेथें आला व कुंदन बाचकर यांच्याकडे पैशाची मागणी केली.. त्यावेळी कुंदन बाचकर यांनी त्याला पैसे देण्यास नकार दिला असता आरोपींनी कुंदन बाचकर यांना शिवीगाळ करून काठ्या व रॉडने मारहाण करायला सुरुवात केली.. सुरीने मारण्याचा देखील प्रयत्न केला. त्यावेळी कुंदन बाचकर यांनी त्यांच्या पत्नीला फोन करून तेथे बोलावून घेतले.

आरोपींनी त्यांना देखील शिवीगाळ करून रोडणी मारहाण केली. आणि कुंदन बाचकर यांच्या गळ्यातील दीड तोळा वजनाची सोन्याची चैन व ७ हजार रुपये रोख रक्कम आरोपींनी जबरदस्तीने हिसकावून घेतले.. कुंदन बाचकर यांच्या फिर्यादीवरून आरोपी मनोज बबन तट ; बबन तट दोघेही राहणार फार्मा क्वार्टर डीग्रस ता. राहुरी. तसेच मनोज बबन तट यांचा भाचा अशा या तीनही आरोपींवर मारहाण व शिवीगाळ स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरच्या घटनेनंतर राहुरी पोलिसांनी आरोपी मनोज तट यास ताब्यात घेऊन गजाआड केले आहे

पुढील तपास राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक गणेश सानप हे करीत आहेत.

## प्राजक्त तनपुरेंच्या भाजप प्रवेशावर संजय राऊतांची टीका

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**मुंबई :** महाराष्ट्रात सध्या विधानपरिषदेच्या निवडणुकीचे वातावरण आहे. महायुती तसेच महाविकास आघाडीकडून उमेदवारी घोषित करण्यात आली असून आज अर्ज भरण्यात येणार आहे. यात विशेष लक्ष वेधले गेले ते म्हणजे भाजपने राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांचे व्याही अरुण लखणी यांना उमेदवारी दिली आहे. या संपूर्ण प्रकरणावर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. तसेच प्राजक्त तनपुरे यांच्या भाजप प्रवेशावर देखील त्यांनी भाष्य केले आहे.

महायुतीमध्ये अनेक नेते बाहेरून येत आहेत, यावर प्रतिक्रिया देताना संजय राऊत म्हणाले, बघा ही भारतीय जनता पक्षाची परंपरा आहे. आता प्राजक्त तनपुरे, मागची निवडणूक भाजप विरोधात लढले, त्याआधी पण त्यांनी अनेकवेळा भाजप विरोधात निवडणूक लढवली. पण आता भाजपने त्यांना पायघड्या घातल्या. का? ते का गेले? विकासकामे व्हायची आहेत. मग सध्या जे आमदार निवडून आले आहेत भाजपचे ते त्यांच्या मतदारसंघात विकासकामे करणार नाहीत? ही ढोंग बंद करा, की आम्ही विकास कामांसाठी पक्षांतर करत आहोत. भाजपने देखील आता काही मर्यादा पाळल्या पाहिजेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांचे व्याही लखाणी यांना भाजपकडून उमेदवारी देण्यात आली आहे. यावर प्रश्न विचारला असता संजय राऊत म्हणाले, लखाणी जे आहेत हे जन्मजात संघाचे कार्यकर्ते, समर्थक, पदाधिकारी आहेत. त्यामुळे त्यात आश्चर्यकारक काय आहे? राज्यसभेत असे अनेक लोक आहेत. विदर्भात जे मुळपुरुष आहेत, किंवा पुराण पुरुष आहेत, त्यात लखाणी यांचे नाव आहे.

# ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत शहापूरकरांची जोरदार एन्ट्री....

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ **वसंत पानसरे**




**ठाणे :** ठाणे व पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक संचालक मंडळ निवडणुकीची अधिकृत घोषणा करण्यात आली असून निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच शहापूर तालुक्यातील राजकीय व सहकार क्षेत्रात मोठ्या हालचाली सुरू झाल्या आहेत. विविध प्रवर्गातून शहापूर तालुक्यातील अनेक इच्छुक उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने निवडणुकीत रंगत वाढली आहे.

जाहीर करण्यात आलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून अर्ज छाननी, माघार व अंतिम उमेदवार यादीचे वेळापत्रकही निश्चित करण्यात आले आहे. मतदान २७ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत होणार असून मतमोजणी २८ जून रोजी होणार आहे. शहापूर तालुक्यातील कृषी पतपुरवठा संस्था प्रवर्गातील एका जागेसाठी प्रकाश वरकुटे,अरुण पानसरे,सुभाष हरड, विद्या वेखंडे आणि अनिल निचिते यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. महिला राखीव दोन जागांसाठी सुनिता सोनू दिनकर, भावना राजेंद्र तिवरे, विमल रघुनाथ पष्टे, दर्शना हरेश पष्टे, विद्या वेखंडे आणि गुलाब भेरे यांनी अर्ज भरले आहेत. तर इमाव प्रवर्गातील एका जागेसाठी संजय तिवरे, अरुण गगे आणि अरुण पानसरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. अनुसूचित जमाती प्रवर्गातील एका जागेसाठी पांडुरंग बरोरा आणि राजाराम वळवी यांनी अर्ज भरले असून विमुक्त जाती प्रवर्गातून गणेश राऊत यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. दरम्यान, जिल्हा बँकेच्या निवडणुकीत शहापूर तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर उमेदवार मैदानात उतरल्याने तालुक्यातील सहकार व राजकीय समीकरणांना वेगळे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आगामी काळात उमेदवारी माघारीनंतर अंतिम चित्र स्पष्ट होणार असून या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## घटना – घडामोडी

### कार-कंटेनरच्या धडकेत महाराष्ट्रातील 2 तरुणांचा मृत्यू:दोघांची प्रकृती गंभीर; सेंधवा येथे मुंबई-आग्रा महामार्गावर अपघात

बातमी जगत | प्रतिनिधी

**सेंधवा, बडवानी :** बडवानी जिल्ह्यातील सेंधवा शहरापासून 10 किलोमीटर दूर मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर सोमवारी सकाळी सुमारे 7 वाजता अपघात झाला. यात दोन तरुणांचा मृत्यू झाला, तर इतर दोघे गंभीर जखमी झाले आहेत. सर्व तरुण महाराष्ट्राचे असल्याचे सांगितले जात आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील संभाजीनगर (औरंगाबाद) आणि पुण्यातील चार तरुण कारने (MH 11CW 4644) इंदूरकडे जात होते. जामली टोल प्लाझाजवळ त्यांची कार अनियंत्रित होऊन दुभाजक ओलांडून चुकीच्या बाजूला गेली. समोरून भरधाव वेगाने कंटेनर (UP 21 DT 2996) येत होता. यादरम्यान दोघांमध्ये जोरदार धडक झाली. कारचा चक्काचूर झाला.

अपघातात संभाजी नगर येथील रहिवासी बद्रीनाथ नांगरे (30) यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर अनिकेत (28) ने सेंधवा येथील शासकीय रुग्णालयात प्राण सोडले. पुणे येथील रहिवासी भूषण राजाराम (25) आणि संभाजी नगर येथील रहिवासी औकार अमित (26) गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे दरम्यान, अनिकेत काळे हा प्रामुख्याने महाराष्ट्रातील (छत्रपती संभाजीनगर) एक लोकप्रिय टेनिस क्रिकेट आणि स्थानिक महाविद्यालयीन क्रिकेट खेळाडू आहे. तो आपल्या धडाकेबाज फलंदाजी, आक्रमक फटकेबाजी आणि 'रिव्हर्स शॉट' खेळण्याच्या कौशल्यासाठी सोशल मीडियावर खूप प्रसिद्ध असल्याची माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच ग्रामीण पोलीस आणि डायल-112 चे पथक घटनास्थळी पोहोचले. जखमींना आणि मृतांना रुग्णवाहिकेतून रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांनी कंटेनर जप्त केला आहे, तर त्याचा चालक अपघातानंतर घटनास्थळावरून पळून गेला. प्रकरणाचा तपास सुरू आहे.

### वर्ध्याच्या प्रसिद्ध 'गोरस भंडार' वरील एफडीएची कारवाई सूडबुद्धीने!

बातमी जगत | प्रतिनिधी


**वर्धा :** वर्धा जिल्ह्याची ओळख ठरलेल्या आणि देशभरात आपल्या दर्जेदार उत्पादनांमुळे प्रसिद्ध असलेल्या गो संवर्धन गोरस भंडारवर अन्न व औषध प्रशासन विभागाने (एफडीए) केलेली कारवाई ही सूडबुद्धीने आणि आकसापोटी करण्यात आल्याचा गंभीर आरोप करत संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांनी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. 31 मे रोजी एफडीए अधिकाऱ्यांनी गोरस भंडार येथे धाड टाकून दूध व दुग्धजन्य पदार्थांचे नमुने घेतले. मात्र नमुन्यांचा अहवाल येण्यापूर्वीच उत्पादन व विक्रीवर बंदी घालत माल सील करण्यात आला. कोणताही अंतिम तपास अहवाल हाती नसताना संस्थेला दोषी ठरविण्याची घाई प्रशासनाने का केली, असा संतप्त प्रश्न शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. महात्मा गांधी यांच्या विचारधारेतून उभ्या राहिलेल्या गोरस भंडारने मागील नऊ दशकांपासून विश्वासार्हतेची परंपरा कायम राखली आहे. संस्थेच्या गोरसपाकसह विविध उत्पादनांना देशासह आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली आहे. आजपर्यंत ग्राहकांकडून कोणतीही गंभीर तक्रार नोंदली गेली नसताना एफडीएच्या अधिकाऱ्यांनी थेट संस्थेची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कारवाईचा सर्वात मोठा फटका जिल्ह्यातील हजारो दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना बसला आहे. गोरस भंडारला दूध पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांचे दूध अचानक बंद पडल्याने आता दूध विकायचे कुठे, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. आधीच नैसर्गिक संकटे, वाढते चारा-दाण्याचे दर आणि महागाईमुळे शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला असताना प्रशासनाच्या या कारवाईने जखमेवर मीठ चोळल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

# स्मार्ट कार्डच्या रजिस्ट्रेशनच्या नावाखाली एसटी प्रवाशांची आर्थिक लूट; अधिकृत दरापेक्षा वसूल केले जाताहेत ३०० रुपये

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ संदिप पळसकर






> ✦ आम्ही ग्रामीण भागात राहणारे एसटीच्या सवलतीवर अवलंबून असतो. शासनाने ठरवलेले दर एक आणि डोणगाव ग्रामपंचायत परिसरात दिनांक 22 5 2026 रोजी झालेल्या कॅम्पमध्ये खाजगी एजंट कडून वसूल करत असलेले दर वेगळेच आहेत. या छुप्या लुटीवर एसटी प्रशासनाने तात्काळ चाप लावावा आणि दोषींवर कडक कारवाई करावी.
> ✦ — अनिल राठोड. डोणगाव

**डोणगाव :** डोणगाव स्मार्ट कार्डच्या रजिस्ट्रेशनच्या नावाखाली एसटी प्रवाशांची आर्थिक लूट; अधिकृत दरापेक्षा वसूल केले जाताहेत ३०० रुपये डोणगाव. राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) वतीने सुरू करण्यात आलेल्या नवीन 'स्मार्ट कार्ड' नोंदणीच्या नावाखाली डोणगाव सह ग्रामीण भागात प्रवाशांची मोठी आर्थिक लूट होत असल्याचा प्रकार समोर आला आहे. शासनाने या कार्डसाठी निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक पैसे अनधिकृतपणे वसूल केले जात असून, प्रवाशांना थेट ३०० रुपयांचा भुर्दंड सहन करावा लागत आहे. एसटी महामंडळाने ज्येष्ठ नागरिक, महिला आणि सवलतधारक प्रवाशांसाठी नवीन स्मार्ट कार्ड अनिवार्य केले आहे. मात्र, या सवलतीचा लाभ घेण्यासाठी नोंदणी करायला जाणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांकडून काही केंद्रांवर आणि खाजगी एजंट्सकडून नियमबाह्य वसुली सुरू आहे. एसटी महामंडळाच्या नियमानुसार, नवीन स्मार्ट कार्डसाठी १९९ रुपये (GST सह) शुल्क ठरवण्यात आले आहे. तसेच जुने कार्ड जमा करून नवीन कार्ड घेणाऱ्या प्रवाशांसाठी १४९ रुपये शुल्क आकारणे बंधनकारक आहे. काही केंद्रांवर कार्ड कार्यान्वित (ॲक्टिव्हेट) करण्यासाठी किमान १०० रुपयांचे रिचार्ज (टॉप-अप) करणे आवश्यक असते. परंतु, प्रवाशांच्या खात्यात कोणतीही रक्कम किंवा रिचार्ज जमा न करता, केवळ नोंदणीच्या नावाखाली सरसकट ३०० रुपये उकळले जात असल्याच्या तक्रारी प्रवाशांनी केल्या आहेत. या लुटीबाबत जेव्हा प्रवाशांनी संबंधित केंद्र चालकांना जाब विचारला, तेव्हा त्यांना अधिकृत पावती देण्यास टाळाटाळ केली जात आहे. ३०० रुपये दिले तरच कार्ड मिळेल, नाहीतर मिळणार नाही, अशी उद्धट भूमिका काही एजंट्सकडून घेतली जात असल्याने प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.तर १९९ रुपयाची पावती देऊन ३०० रुपये ग्राहकाकडून घेण्यात येत आहे. याकडे संबधित प्रशासनाने लक्ष देऊन बनावट ग्राहक पाठवून ज्यादा पैसे घेणाऱ्या केंद्र चालकाकाकडून व एजंट वर फौजदारी कारवाई करावी अशी मागणी होत आहे

खाजगी किंवा अनधिकृत केंद्रांवर जाण्याऐवजी थेट जवळच्या एसटी बस आगारात (डेपो) जाऊनच नोंदणी करावी. ३०० रुपये घेणाऱ्या केंद्र चालकांकडून 'कार्ड फी' आणि 'रिचार्ज रक्कम' अशी स्वतंत्र वर्गवारी असलेली अधिकृत पावती आवर्जून मागावी.जास्तीचे पैसे मागणाऱ्यांची तक्रार त्वरित संबंधित आगार व्यवस्थापकांकडे (Depot Manager) नोंदवावी. एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेऊन, सर्व नोंदणी केंद्रांची तपासणी करावी आणि प्रवाशांची होणारी ही लूट थांबवावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## चोपड्यात देहव्यापार अड्ड्यावर चोपडा शहर पोलिसाची मोठी कारवाई

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ रविंद्र कोळी

**चोपडा :** चोपडा शहरातील प्रताप हायस्कूल कडून मागे, तहसील कार्यालयाच्या मार्गाने स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या मोकळ्या जागेत काही पत्रांच्या झोपड्यांमध्ये अनैतिक व्यापार सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती, या माहितीच्या आधारे

सुरू असलेल्या कथित देहव्यापार अड्ड्यावर चोपडा शहर पोलिसांनी धाड टाकत मोठी कारवाई केली. या प्रकरणी ११ आरोपींविरुद्ध अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २९ मे रोजी सायंकाळी सुमारे ६.४० वाजता ही कारवाई करण्यात आली. छाप्यादरम्यान पाच महिलांची सुटका करण्यात आली असून त्यामध्ये राजस्थान, नेपाळ आणि मध्यप्रदेश येथील महिलांचा समावेश असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणातील आरोपींमध्ये शिल्या राम लामा (वय ३५), पूजा टेकीराम बागुल (वय २९), शिवाजी मिरगाव पाटील, फरीद कबीर शेख, शाबरब बशीर खान, शरीफ सुभान अली, बाबू उर्फ जतीन चौधरी,



फिरोजी ईसा खान, बाबू उर्फ जितेंद्र साबीर खान, संदीप उर्फ संजू लक्ष्मण पाटील आणि सुरेश राजपूत यांचा समावेश आहे. कारवाईदरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून ५०० रुपयांची एक नोट (क्रमांक 6VV 700366) तसेच दोन निरोधाचे बॉक्स जप्त केले. आरोपी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी झोपड्यांमध्ये देहव्यापार चालवत असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी चोपडा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २२४/२०२६ अन्वये अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ च्या कलम ३, ४, ५ व ७ तसेच भारतीय न्याय संहिता कलम १४३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक पवनकुमार देसले करीत आहेत.

## मराठा आंदोलनातील मृत वारसांना MIDC मध्ये नोकरी:राज्य सरकारचा शासन निर्णय जारी

बातमी जगत | प्रतिनिधी

**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या लढ्यात बलिदान देणाऱ्या आंदोलकांच्या कुटुंबीयांसाठी राज्य सरकारने एक मोठा दिलासादायक निर्णय घेतला आहे. या आंदोलनादरम्यान मृत्यू झालेल्या आंदोलकांच्या पात्र वारसांना आता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळात (MIDC) अनुकंपा तत्त्वावर नोकरी दिली जाणार आहे. सामान्य प्रशासन विभागाने यासंदर्भात अधिकृत शासन निर्णय (GR) जारी केला असून, यामुळे अनेक बाधित कुटुंबांना मोठा आधार मिळणार आहे.





मराठा आरक्षणासाठी अंतरवाली सराटी येथे उपोषणास बसलेले मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनातील मृतांच्या वारसांना शासकीय सेवेत सामावून घेण्याची प्रमुख मागणी केली होती. यापूर्वी एसटी महामंडळात नोकरी देण्याचा निर्णय झाला होता, मात्र त्यात आता व्याप्ती वाढवून एमआयडीसीचाही समावेश करावा, असा त्यांचा आग्रह होता. मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिलेल्या आश्वासनानुसार, अवघ्या दोन दिवसांत सरकारने हा अध्यादेश काढून आपली कटिबद्धता दर्शवली आहे. या निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकारने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना विशेष सूचना दिल्या आहेत. मराठा आरक्षण आंदोलनात मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या वारसांची सखोल पडताळणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तपासणीअंती जे वारस पात्र ठरतील, त्यांना जिल्हा प्रशासनाकडून अधिकृत प्रमाणपत्र दिले जाईल. या प्राप्त प्रमाणपत्राच्या आधारे संबंधित वारसांना एमआयडीसीमध्ये नोकरी मिळवण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. राज्य सरकारने यापूर्वीच मृत आंदोलकांच्या वारसांना राज्य परिवहन महामंडळात (ST) नोकऱ्या देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र आंदोलनादरम्यान बलिदान दिलेल्या अनेक मराठी बांधवांच्या वारसांकडून एसटी महामंडळात नोकरी करण्यास नकार दिला होता. त्यानंतर आता सरकारकडून त्या बांधवांसाठी औद्योगिक विकास महामंडळात (MIDC) नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. सरकारच्या या भूमिकेचे मराठा समाजातून स्वागत होत आहे. आंदोलकांच्या कुटुंबीयांना सामाजिक आणि आर्थिक सुरक्षा देण्याच्या दृष्टीने ही कार्यवाही अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. मराठा समाजाच्या भावना लक्षात घेऊन आणि आंदोलकांचे बलिदान व्यर्थ जाऊ नये, या उद्देशाने सरकारने ही तातडीची पावले उचलली आहेत. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी या प्रकरणाचा पाठपुरावा करून प्रशासकीय पातळीवर हालचाली वेगवान केल्या होत्या. या निर्णयामुळे आंदोलनात आपल्या कर्त्या व्यक्तीला गमावलेल्या कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी मोठी मदत होणार असल्याचे बोलले जात आहे.

